जा.क्र./विप्र-७/क्रॉपसॅप १६-१७/प्र.क्र.१/३८२ /१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ५
दिनांक:२७/०७/२०१६

प्रति,

१. **विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)** -------------------------------------

२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)** --------------------------------

**विषय:** पिकांवरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (कॉपसॅप): २०१६-१७ मार्गदर्शक सुचना अंतिम करणेबाबत...

**संदर्भ:** १. आयुक्तालयाच्या अंतरीम मार्गदर्शक सुचनांचे पत्र जा.क्र./विप्र-७/क्रॉपसॅप १६-१७/प्र.क्र.१/३०९/१६, दि.१/६/२०१६

२. दि.१४/६/२०१६ रोजी सहभागी संस्थांच्या तांत्रिक बैठकीत क्रॉपसॅप प्रकल्पाकरीता सन २०१६-१७ साठी निश्चित करण्यात आलेली सर्वेक्षण प्रपत्रे व ॲडव्हायजरी कॅप्सूल्स.

३. दि.१५/६/२०१६ रोजीच्या क्रॉपसॅप प्रकल्प सुकाणू समितीच्या बैठकीतील चर्चा व निर्णय

४. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र.किरोनि/१४१६/प्र.क्र.२०१/४-अे,दि.१८/७/२०१६

उपरोक्त संदर्भीय दि.१/६/२०१६ च्या पत्रान्वये सन २०१६-१७ मध्ये क्रॉपसॅप प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने अंतरीम सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनांवर दि.१५/६/२०१६ रोजी प्रकल्पाच्या सुकाणू समितीच्या बैठकीत चर्चा करण्यात आली असनू त्यामध्ये अंशत: बदल सुचविण्यात आले आहेत तसेच, काही नवीन मुद्दे समाविष्ठ करण्यात आले आहेत. संदर्भीय दि.१८/७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये सदर प्रकल्पास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. संदर्भीय शासन निर्णयात नमूद केल्यानुसार नोंदणीकृत मनुष्यबळ सेवा पुरवठा करणाऱ्या संस्थेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यासोबत पत्रव्यवहार करताना, क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी थेट कर्मचाऱ्याशी पत्रव्यवहार न करता संस्थेमार्फत करावा. कामाचा अनुभव किंवा उल्लेखनीय काम केल्याबाबतचे प्रशस्तीपत्रक थेट कर्मचाऱ्यांना देण्यात येऊ नये. संदर्भीय शासन निर्णयाचे अधीन राहून खाली नमूद केलेल्या बदलांसह संदर्भीय पत्र दि.१/६/२०१६ नुसार पाठविण्यात आलेल्या अंतरीम मार्गदर्शक सूचना या पत्रान्वये अंतिम करण्यात येत आहेत. त्यानुसार अंतरीम मार्गदर्शक सूचनातील सुधारीत केलेले मुद्दे खालीलप्रमाणे वाचावेत.

**५.११.३** कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांचेकडून कीड रोग सर्वेक्षणाचे काम तांत्रिक दृष्ट्या योग्य प्रकारे होत असल्याबाबतची खात्री करणे व त्यादृष्टीने त्यांना सहाय्य करणे.

**५.११.६** आयपीएम गाव संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने प्रकल्पांतर्गत कृषि विद्यापीठ स्तरावरील संशोधन सहयोगी यांचेसह आयपीएम गाव संकल्पना अंमलबजावणीच्या दृष्टीने समन्वय ठेवतील.

**५.११.७** ज्या ठिकाणी कीड रोगाची स्थिती आर्थिक नुकसान पातळीच्या वर गेली आहे त्या ठिकाणी भेटी देऊन कारण मिमांसा तपासतील तसेच, उपाय योजना सुचवतील.

**६. मधील फक्त पहीला परीच्छेद पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.**

**सर्वेक्षण कार्यपध्दती:-**

सोयाबीन, कापूस, भात व तूर पिकांसाठी राज्याच्या ३४ जिल्हयांतील कृषि विभागाच्या ९० उपविभागात सुमारे ८२३ कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट) व ८४ कृषि पर्यवेक्षक तर हरभरा पिकासाठी राज्याच्या २९ जिल्हयातील कृषि विभागाच्या ७८ उपविभागांत सुमारे ४६९ कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट) व ४७ कृषि पर्यवेक्षक किडरोगांच्या विविध अवस्थांची कामगंध सापळे व इतर साधनांच्या मदतीने दर सोमवार ते शुक्रवार प्रत्यक्ष निरिक्षणे मोबाईलद्वारे संगणक प्रणाली मध्ये ऑनलाईन संकेतस्थळावर भरतील. **कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांकडील सर्वेक्षण करत असलेल्या गावांच्या व्यतिरीक्त क्षेत्रीय अधिकारी/ कर्मचारी यांचेकडून मिळालेल्या तसेच प्रसार माध्यमांतील माहितीनुसार अचानक कीड रोगांचा प्रादुर्भाव झालेल्या ठिकाणी दर शनिवारी कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक**

**भेट देतील व तेथील कीड रोगांची प्रत्यक्ष निरिक्षणे मोबाईलद्वारे संगणक प्रणाली मध्ये ऑनलाईन संकेतस्थळावर भरतील.** प्रादुर्भावीत ठिकाणांबाबत शेतकरी आणि लोक प्रतिनिधी यांनी दिलेल्या माहितीचाही विचार करता येईल. कीड रोगांचा प्रादुर्भाव नसल्यास दर शनिवारी कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक उपविभाग स्तरावर एकत्र येतील व सदर आठवड्यात मोबाईलद्वारे कीड रोगांची निरीक्षणे भरण्याबाबत आलेल्या अडचणी व त्या सोडविण्याबाबत केलेल्या उपाय योजनांबद्दल चर्चा करतील. संकेतस्थळावरील या निरिक्षणांचे संस्करण राष्ट्रीय एकात्मिक कीड व्यवस्थापन केंद्र (भारतीय कृषि संशोधन परिषद), नवी दिल्ली/ राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे यांचेकडून करण्यात येईल व त्यांचे मार्गदर्शनाखाली राज्यातील संबधीत कृषि विद्यापीठांचे शास्त्रज्ञ सदर संस्करीत तपशिलाचे विश्लेषण करुन दर गुरुवार व सोमवारी ऑनलाईन संकेतस्थळावर तालुकानिहाय उपाय योजना सुचवितील. या उपाययोजनांच्या आधारे शेतकऱ्यांना दुरदर्शन, आकाशवाणी, एसएमएस, वृत्तपत्रे इत्यादी प्रसिध्दी माध्यमांव्दारे मार्गदर्शन करण्यात येईल. या मार्गदर्शनानुसार शेतकऱ्यांना वेळच्या वेळी उपाययोजना करुन कीड रोग नियंत्रण करता येईल

**७.३.३ मधील फक्त पहीला व दुसरा परीच्छेद पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.**

**शेतकऱ्यांसाठी पीक संरक्षण सल्ला:-** केंद्र शासनाच्या कीसान पोर्टलवरील एसएमएस सुविधा वापरण्यासाठी केंद्र शासनाने दि.२०/५/२०१६ पासून सुधारण केली आहे. त्यानुषंगाने आयुक्तालयामार्फत परिपत्रक जाक्र./संप्र/परिपत्रक/१३७/१३/२०१६,दि.३०/०५/२०१६ निर्गमित करण्यात आले आहे. सुधारीत धोरणाच्या अनुषंगाने सदर परिपत्रकातील सुचना विचारात घेऊन उपविभागीय कृषि अधिकारी यांनी क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत ऑनलाईन अहवालानुसार विद्यापिठाने दिलेले **पीक संरक्षण सल्ले आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे पाठवावेत.** उपविभागास आठवड्यास निर्धारीत केलेली एसएमएसची संख्या पूर्ण झाल्यास जिल्हास्तरावरील नोंदणीकृत युजर्समार्फत एसएमएस पाठविण्यात यावेत त्याकरीता उपविभागीय कृषि अधिकारी यांनी एसएमएसचा मसूदा जिल्हास्तरावरील नोंदणीकृत युजर्स यांना पाठवावा व जिल्हास्तरावरुन सदर सल्ला संबंधीत तालुक्यातील शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे पाठविण्यात यावा. **क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत एसएमएस पाठविण्याची जबाबदारी प्रथमत: उपविभागीय कृषि अधिकारी व त्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल.**

प्रत्येक उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांना आठवडयातून दोन वेळा ऑनलाईन प्राप्त होणारी ॲडव्हायजरी एसएमएसद्वारे शेतकऱ्यांना पाठवावी. तसेच, या ॲडव्हाजरीचा एसएमएस तालुका कृषि अधिकारी यांनाही पाठवावा. तालुका कृषि अधिकारी यांनी सदर मराठी भाषेतील एसएमएसचा मजकूर त्यांचे अधिनस्त मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक, कृषि सहाय्यक व "आत्मा" अंतर्गत निवडण्यात आलेल्या शेतकरी मित्र (FF) यांचेमार्फत तालुक्यातील प्रत्येक गावातील कृषि वार्ताफलकावर तसेच, कृषि सेवा केंद्रावर लावली जाईल असे पहावे. कीड रोगांचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या जवळ पोहोचताच मराठी भाषेतील ॲडव्हाजरी एसएमएसची जम्बो झेरॉक्स प्रत तयार करुन वर नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक गावात लावली जाईल असे पहावे. यासाठी तालुक्यात सर्वेक्षणासाठी कार्यरत असलेल्या कीड सर्वेक्षकांच्या प्रमाणात प्रति कीड सर्वेक्षक रु.२०००/- याप्रमाणे प्रत्येक तालुक्यास निधीची स्वतंत्र तरतूद केली आहे.

**७.३.५ "आयपीएम व्हीलेज" संबंधीत कृषि सहाय्यक यांचेसाठी प्रशिक्षण:-** मुद्दा क्र. १२ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक जिल्ह्यातील निवड केलेल्या गावात आय.पी.एम संकल्पना प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने आय.पी.एम गाव संबंधीत कृषि सहाय्यक/ कृषि पर्यवेक्षक/मंडळ कृषि अधिकारी यांच्यासाठी (एकूण ७० प्रशिक्षणार्थी) राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था, हैद्राबाद येथे आयोजीत करण्यात आलेल्या पाच दिवसांच्या प्रशिक्षणाकरीता सदर संस्थेस रुपये १२००/- प्रती दिन प्रती कर्मचारी याप्रमाणे खर्च अदा करण्यात येईल.

**८.२ मधील फक्त पहीला परीच्छेद पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.**

**कीड सर्वेक्षक (पेस्ट स्काऊट):-** ज्याठिकाणी सोयाबीन, कापूस, भात तसेच तूर हे कापूस पिकात अंतरपिक म्हणून घेतले जाते त्या ठिकाणी सोयाबीन, कापूस, पिकाच्या प्रति १२००० हे. व भाताचे ५००० हे. असे एकूण १७००० हे.

साठी दोन कीड सर्वेक्षक **(तथापि, नागपूर विभागात भात पिकाचे सलग क्षेत्र असल्याने सोयाबीन, कापूस आणि भात पिकांच्या एकत्रित प्रति १२००० हेक्टर क्षेत्राकरीता एका कीड सर्वेक्षक राहील.)** तसेच, केवळ भाताचे ५००० हे. साठी व हरभरा पिकाच्या प्रति ३००० हे. साठी एक कीड सर्वेक्षक राहिल. त्यांना दरमहा (हजर दिवसांनुसार) रु.४६८०/- इतके मूळ मासिक वेतन, रु.१५००/- प्रवास भत्ता, रु.२३४/- घरभाडे भत्ता (मूळ वेतनावर ५.० टक्के), रु.९३६/- विशेष भत्ता, रु.२७३/- रजा रोखीकरण (१२ महीन्यांत एकूण २१ दिवस यानुसार प्रति महीना १.७५ दिवस याप्रमाणे) रु.३९०/- लाभांश (मूळ वेतनावर ८.३३ टक्के) असे एकुण रु.८०१३/- स्थूल वेतन राहील. सदर वेतनातून भविष्य निर्वाह निधी रु.५६२/- (मूळ वेतनावर १२ टक्के), राज्य कामगार विमा (लागू असल्यास) रु.९२/- (मूळ वेतन+ घरभाडे भत्ता+ प्रवास भत्ता+ विशेष भत्ता यावर १.२५ टक्के), व्यवसाय कर रु.१७५/- याप्रमाणे एकूण रु.८२९/- इतकी रक्कम स्थूल वेतनातून कपात करण्यात येईल व **रु.७१८४/- इतके निव्वळ वेतन संबंधीत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यामध्येच जमा करण्यात येईल.** कृषि विभागाचा हिस्सा म्हणून भविष्य निर्वाह निधी रु.६३७/- (मूळ वेतनावर १३.६१ टक्के), राज्य कामगार विमा (लागू असल्यास) रु.३५०/- (मूळ वेतन+ घरभाडे भत्ता+ प्रवास भत्ता+ विशेष भत्ता यावर ४.७५ टक्के) संबंधीत कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा खात्यावर सेवा पुरवठादाराकडून भरण्यात येईल. **सदर रकमांमध्ये नियमानुसार काही बदल झाल्यास त्याप्रमाणे त्याची अदायगी करणे क्रमप्राप्त राहील.** त्या व्यतिरीक्त मुद्दा क्र.८.१ मधील सर्वसाधारण अटी व शर्ती व मुद्दा क्र.९.३ मधील वेतन वितरण कार्यपद्धती नुसार इतर रकमांची अदायगी सेवा पुरवठादारामार्फत करण्यात येईल. वरीलप्रमाणे कीड सर्वेक्षकांसाठी वेतन व इतर सेवा कर तसेच सेवा आकारासह (मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराच्या सेवा आकारासह) रू.१०७२०/- निधीची तरतूद राहिल.

**८.४ मधील फक्त पहीला परीच्छेद पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.**

**संगणक प्रणाली मदतनीस (सॉफ्टवेअर सपोर्टर):-** कीड सर्वेक्षण अहवाल ऑनलाईन संगणक प्रणालीवर अपलोड करताना कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षक यांना संगणक प्रणाली संबंधी येणाऱ्या अडचणींची सोडवणूक करणेकरिता विभागस्तरावर संगणक प्रणाली मदतनीस राहिल. त्यांना दरमहा (हजर दिवसांनुसार) रु.८१००/- इतके मूळ मासिक वेतन, रु.४०५/- घरभाडे भत्ता (मूळ वेतनावर ५.० टक्के), रु.९३६/- विशेष भत्ता, रु.४७३/- रजा रोखीकरण (१२ महीन्यांत एकूण २१ दिवस यानुसार प्रति महीना १.७५ दिवस याप्रमाणे) रु.६७५/- लाभांश (मूळ वेतनावर ८.३३ टक्के) असे एकूण रु.१०५८९/- स्थूल वेतन राहील. सदर वेतनातून भविष्य निर्वाह निधी रु.९७२/- (मूळ वेतनावर १२ टक्के), राज्य कामगार विमा (लागू असल्यास) रु.११९/- (मूळ वेतन+ घरभाडे भत्ता+ प्रवास भत्ता+ विशेष भत्ता यावर १.२५ टक्के), व्यवसाय कर रु.२००/- याप्रमाणे एकूण रु.१२९१/- इतकी रक्कम स्थूल वेतनातून कपात करण्यात येईल व **रु.९२९८/- इतके निव्वळ वेतन संबंधीत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यामध्येच जमा करण्यात येईल.** कृषि विभागाचा हिस्सा म्हणून भविष्य निर्वाह निधी रु.११०२/- (मूळ वेतनावर १३.६१ टक्के), राज्य कामगार विमा (लागू असल्यास) रु.४४९/- (मूळ वेतन+ घरभाडे भत्ता+ प्रवास भत्ता+ विशेष भत्ता यावर ४.७५ टक्के) संबंधीत कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा खात्यावर सेवा पुरवठादाराकडून भरण्यात येईल. **सदर रकमांमध्ये नियमानुसार काही बदल झाल्यास त्याप्रमाणे त्याची अदायगी करणे क्रमप्राप्त राहील.** त्या व्यतिरीक्त मुद्दा क्र.८.१ मधील सर्वसाधारण अटी व शर्ती व मुद्दा क्र.९.३ मधील वेतन वितरण कार्यपद्धती नुसार इतर रकमांची अदायगी सेवा पुरवठादारामार्फत करण्यात येईल. वरीलप्रमाणे संगणक प्रणाली मदतनीस साठी वेतन व इतर सेवा कर तसेच सेवा आकारासह (मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराच्या सेवा आकारासह) रू.१४४५०/- निधीची तरतूद राहिल.

**८.५ मधील फक्त पहीला परीच्छेद पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.**

**संगणक ऑपरेटर:-** प्रकल्पांतर्गत ऑनलाईन भरलेल्या अहवालांची संकेतस्थळावरुन माहीती घेणे, विहीत प्रपत्रात माहितीचे संकलन करणे, विविध बैठकींसाठी आवश्यक माहीती तयार करणे यासाठी राज्यस्तरीय सनियंत्रण कक्षासाठी एक संगणक ऑपरेटर राहिल. त्यास दरमहा (हजर दिवसांनुसार) रु.५४००/- इतके मूळ

मासिक वेतन, रु.२७०/- घरभाडे भत्ता (मूळ वेतनावर ५.० टक्के), रु.९३६/- विशेष भत्ता, रु.३१५/- रजा रोखीकरण (१२ महीन्यांत एकूण २१ दिवस यानुसार प्रति महीना १.७५ दिवस याप्रमाणे) रु.४५०/- लाभांश (मूळ वेतनावर ८.३३ टक्के) असे एकूण रु.७३७१/- स्थूल वेतन राहील. सदर वेतनातून भविष्य निर्वाह निधी रु.६४८/- (मूळ वेतनावर १२ टक्के), राज्य कामगार विमा (लागू असल्यास) रु.८३/- (मूळ वेतन+ घरभाडे भत्ता+ प्रवास भत्ता+ विशेष भत्ता यावर १.२५ टक्के), व्यवसाय कर रु.१७५/- याप्रमाणे एकूण रु.९०६/- इतकी रक्कम स्थूल वेतनातून कपात करण्यात येईल व **रु.६४६५/- इतके निव्वळ वेतन संबंधीत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यामध्येच जमा करण्यात येईल.** कृषि विभागाचा हिस्सा म्हणून भविष्य निर्वाह निधी रु.७३५/- (मूळ वेतनावर १३.६१ टक्के), राज्य कामगार विमा (लागू असल्यास) रु.३१४/- (मूळ वेतन+ घरभाडे भत्ता+ प्रवास भत्ता+ विशेष भत्ता यावर ४.७५ टक्के) संबंधीत कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा खात्यावर सेवा पुरवठादाराकडून भरण्यात येईल. **सदर रकमांमध्ये नियमानुसार काही बदल झाल्यास त्याप्रमाणे त्याची अदायगी करणे क्रमप्राप्त राहील.** त्या व्यतिरिक्त मुद्दा क्र.८.१ मधील सर्वसाधारण अटी व शर्ती व मुद्दा क्र.९.३ मधील वेतन वितरण कार्यपद्धती नुसार इतर रकमांची अदायगी सेवा पुरवठादारामार्फत करण्यात येईल. वरीलप्रमाणे संगणक ऑपरेटर साठी वेतन व इतर सेवा कर तसेच सेवा आकारासह (मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराच्या सेवा आकारासह) रू.१००२०/- निधीची तरतूद राहिल.

**८.६ मधील फक्त पहीला परीच्छेद पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.**

**राज्यस्तरीय सनियंत्रण कक्षासाठी लेखापाल:-** प्रकल्पांतर्गत सहभागी संस्थांना निधी वाटप करणे, त्याचा विहीत प्रपत्रात हिशेब ठेवणे, मासिक प्रगती अहवाल अद्ययावत ठेवणे, विविध बैठकींसाठी आवश्यक माहीती तयार करणे यासाठी राज्यस्तरीय सनियंत्रण कक्षासाठी एक लेखापाल राहिल. त्यांना दरमहा (हजर दिवसांनुसार) रु.६७५०/- इतके मूळ मासिक वेतन, रु.३३८/- घरभाडे भत्ता (मूळ वेतनावर ५.० टक्के), रु.९३६/- विशेष भत्ता, रु.३९४/- रजा रोखीकरण (१२ महीन्यांत एकूण २१ दिवस यानुसार प्रति महीना १.७५ दिवस याप्रमाणे) रु.५६२/- लाभांश (मूळ वेतनावर ८.३३ टक्के) असे एकूण रु.८९८०/- स्थूल वेतन राहील. सदर वेतनातून भविष्य निर्वाह निधी रु.८१०/- (मूळ वेतनावर १२ टक्के), राज्य कामगार विमा (लागू असल्यास) रु.१०१/- (मूळ वेतन+ घरभाडे भत्ता+ प्रवास भत्ता+ विशेष भत्ता यावर १.२५ टक्के), व्यवसाय कर रु.१७५/- याप्रमाणे एकूण रु.१०८६/- इतकी रक्कम स्थूल वेतनातून कपात करण्यात येईल व **रु.७८९४/- इतके निव्वळ वेतन संबंधीत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यामध्येच जमा करण्यात येईल.** कृषि विभागाचा हिस्सा म्हणून भविष्य निर्वाह निधी रु.९१९/- (मूळ वेतनावर १३.६१ टक्के), राज्य कामगार विमा (लागू असल्यास) रु.३८२/- (मूळ वेतन+ घरभाडे भत्ता+ प्रवास भत्ता+ विशेष भत्ता यावर ४.७५ टक्के) संबंधीत कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा खात्यावर सेवा पुरवठादाराकडून भरण्यात येईल. **सदर रकमांमध्ये नियमानुसार काही बदल झाल्यास त्याप्रमाणे त्याची अदायगी करणे क्रमप्राप्त राहील.** त्या व्यतिरिक्त मुद्दा क्र.८.१ मधील सर्वसाधारण अटी व शर्ती व मुद्दा क्र.९.३ मधील वेतन वितरण कार्यपद्धती नुसार इतर रकमांची अदायगी सेवा पुरवठादारामार्फत करण्यात येईल. वरीलप्रमाणे लेखापाल साठी वेतन व इतर सेवा कर तसेच सेवा आकारासह (मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराच्या सेवा आकारासह) रू.१२२५०/- निधीची तरतूद राहिल.

**९.५.१४** सर्वेक्षण चमूवर देखरेख ठेवण्यासाठी केलेल्या फीरस्तीसाठी संबंधीत कृषि विज्ञान केंद्रास इंधन व आकस्मिक खर्चाची तरतूद जिल्हा स्तरावरुन अदा करण्यात यावी.

**१२.४** सदर कार्यक्रमाचे जिल्हास्तरावरील समन्वयन, प्रकल्पांतर्गत कृषि विद्यापीठ स्तरावर नियुक्त केलेले संशोधन सहयोगींसह संबंधीत जिल्ह्यासाठी नियुक्त केलेल्या कृषि विज्ञान केंद्रामार्फत करण्यात येईल. जिल्हानिहाय निवड केलेल्या आयपीएम गावातील पिकाच्या लागवड तंत्रज्ञानाच्या विविध बाबी व आयपीएम घटकांची निश्चिती करणे, संबंधीत गावातील कृषि सहाय्यकांच्या सहाय्याने त्याची अंमलबजावणी करणे, राबविलेल्या घटकांची नोंद करुन संबंधीत पिकाच्या हंगाम अखेर पुढील प्रपत्रातील अहवाल पीक संबंधीत प्रकल्पांतर्गत सहभागी संशोधन

संस्था व कृषि आयुक्तालयास इंगजीमधून व संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी यांना मराठीमधून संबंधीत कृषि विज्ञान केंद्र यांच्या सहयोगाने सादर करण्याची जबाबदारी संशोधन सहयोगी यांची असेल.

**१३.३ मधील फक्त पहीला परीच्छेद पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.**

**जिल्हास्तर:-**उपविभागास आठवड्यास निर्धारीत केलेली एसएमएसची संख्या पूर्ण झाल्यास जिल्हा स्तरावरुन कीड रोग उपाय योजनेचे एसएमएस पाठविण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल. त्यानुषंगाने **क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत एसएमएस पाठविण्याची जबाबदारी प्रथमत: उपविभागीय कृषि अधिकारी व त्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल.**

**१३.४ उपविभागस्तर:-** या प्रकल्पाची संपूर्ण क्षेत्रीय स्तरावरील कार्यन्वयनाची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकांरी यांची राहील. “आयपीएम गाव” संकल्पना राबविणे, त्यांचे कार्यक्षेत्रातील सोबतचे प्रपत्रानुसार उपलब्ध असलेल्या कीड सर्वेक्षक, कृषि पर्यवेक्षक, संगणक प्रचालक यांचे मदतीने संपूर्ण प्रकल्पाचे वेळच्यावेळी योग्य नियोजन करुन सर्वेक्षण, उपाययोजना सल्ला, नियोजन, अंमलबजावणी व संनियत्रण करणे. प्रकल्पांतर्गत नियुक्त कीड सर्वेक्षक व कृषि पर्यवेक्षकांकडून योग्य प्रकारे सर्वेक्षण होण्यासाठी त्यांचेवर देखरेख ठेवणे तसेच, ते मुख्यालयी हजर असलेबाबत खात्री करण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. उपविभागीय कृषि अधिकारी प्रत्येक आठवडयासाठी तालुकानिहाय ऑनलाईन ॲडव्हायझरीचा एसएमएस तालुका कृषि अधिकारी यांना पाठवतील. प्रत्येक उपविभागीय कृषि अधिकारी प्रत्येक आठवडयामध्ये त्यांचे कार्यक्षेत्रातील शेतकरी व तालुका कृषि अधिकाऱ्यांना दोन वेळा एसएमएसद्वारे ॲडव्हायजरी पाठवतील, तसेच, त्या रेडीओ, आकाशवाणी, वृत्तपत्रात निवेदनाद्वारे प्रसिध्दीस देण्याची जबाबदारी उपविभागीय कृषि अधिकारी यांची राहील. उपविभागास आठवड्यास निर्धारीत केलेली एसएमएसची संख्या पूर्ण झाल्यास एसएमएसचा मसूदा जिल्हास्तरावरील नोंदणीकृत युजर्स यांना पाठविणे व त्यांच्यामार्फत सदर सल्ला संबंधीत तालुक्यातील शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे पाठविण्यात आल्याची खात्री करण्याची जबाबदारी **प्रथमत: उपविभागीय कृषि अधिकारी व त्यानंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल.** या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी आणि एकूणच यश उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या नियोजन आणि प्रत्यक्ष कामावर अवलंबून आहे. त्या दृष्टीने उपविभागीय कृषि अधिकारी यांची भूमिका अत्यंत महत्वाची राहील.

**१३.५ तालुकास्तर:-** या प्रकल्पांतर्गत कृषि विभागाच्या क्षेत्रिय कर्मचाऱ्यांनी प्रगतशील शेतकऱ्यांच्या मदतीने खरीपातील सोयाबीन-कापूस-भात-तूर पिकविणाऱ्या प्रत्येक गावामध्ये पुर्ण हंगामात दहा व रब्बी मधील हरभरा पिकविणाऱ्या प्रत्येक गावामध्ये पुर्ण हंगामात दहा याप्रमाणे साप्ताहिक बैठकांचे नियोजन व अंमलबजावणी करणे तसेच, उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून आठवडानिहाय ऑनलाईन सर्वेक्षणावर अधारीत एएमएसद्वारे प्राप्त झालेल्या ॲडव्हायजरीच्या मराठी भाषेतील जम्बो झेरॉक्स करुन मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक व “आत्मा” अंतर्गत निवडण्यात आलेल्या शेतकरी मित्र (FF) यांचेमार्फत प्रत्येक गावातील कृषि वार्ता फलकावर तसेच, कृषि सेवा केंद्राच्या नोटीस बोर्डवर वेळोवेळी लावल्या जातील याकडे व्यक्तिश: लक्ष देण्याची संपुर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील. **उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून ॲडव्हाजरीचा एसएमएस प्राप्त करुन घेणे व सदर एसएमएसची मराठी भाषेतील जम्बो झेरॉक्स प्रती तयार करुन तालुक्यातील प्रत्येक गावातील कृषि वार्ताफलकावर तसेच, कृषिसेवा केंद्रांवर लावण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी व त्यांचे अधिनस्त मंडळ कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यक यांची राहील. तसेच, ज्या ठिकाणी कीड रोगांची तीव्रता वाढलेली आहे त्याठिकाणी कीड रोग नियंत्रणाची मोहिम राबविण्याकरिता आपत्कालीन परिस्थितीत विविध योजनांतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या निविष्ठा शेतकऱ्यांना वेळीच उपलब्ध करुन कीड रोगांची तीव्रता आर्थिक नुकसान संकेत पातळीच्या खाली आणण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील.**

मुद्दा क्र. १५ मधील “प्रपत्र अ” अ.क्र.५,१०,११,१३ व २० पुढीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहेत.

“प्रपत्र अ”

पिकांवरील कीड- रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) २०१६-१७

**सोयाबीन-कापूस, तूर, भात व हरभरा पिकांकरिता बाबनिहाय लागणाऱ्या निधीचा तपशील**

(रु. लाखात)

| अ. क्र. | बाब | बाबनिहाय खर्चाचा तपशील | लागणारे अनुदान | संस्था |
|---|---|---|---|---|
| ५ | एनसीआयपीएम नवी दिल्ली येथील इंटरनेट सर्व्हरच्या व्यवस्थापनासाठी एक सर्व्हर सपोर्टर रु.२५००० प्रति महिना याप्रमाणे ३.५ महिन्यांसाठी (एप्रिल ते जून) | इंटरनेट सर्व्हरची देखभाल व व्यवस्थापन करणे | ०.८८ | **राष्ट्रीय एकात्मिक कीड व्य. केंद्र, नवी दिल्ली** |
| | एकूण अ | | ६६८.४० | |
| १० | राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था, हैद्राबाद येथे भात, सोयाबीन, कापूस, तुर व हरभरा पिकांचे एकात्मिक कीड व्यवस्थापनासाठी जैविक कीड नियंत्रण औषधे तयार करणेबाबत "आयपीएम व्हीलेज" संबंधीत व त्या लगतच्या गावातील कृषि सहाय्यक यांचेसाठी पाच दिवसीय प्रशिक्षण. रुपये ६०००/-प्रती कर्मचारी याप्रमाणे ७० कर्मचाऱ्यांसाठी | प्रशिक्षणार्थींच्या निवास, भोजन, प्रशिक्षण साहीत्य व प्रवासासाठी. | ४.२० | **एन आय पी एच एम-हैद्रबाद** |
| | एकूण ब | | २५.७७ | |
| ११ | **सर्वेक्षणासाठी फेरोमेन ट्रॅप्स व ल्यूर्सः-** **अ) सोयाबीन-कापूस, तूर व भातः-** कोकण विभाग भात पिकाकरीता प्रति कीड सर्वेक्षक २० फिक्स प्लॉटसाठी ४० फेरोमेन ट्रॅप्स व १२० ल्यूर्स याप्रमाणे ८० कीड सर्वेक्षकांसाठी रु.२०००/- तर इतर विभागात सोयाबीन-कापूस, तूर व भात पिकांकरीता प्रति कीड सर्वेक्षक २० फिक्स प्लॉटसाठी ९२ फेरोमेन ट्रॅप्स व २६४ ल्यूर्स व एक किलो एरंडी बियाणे यासाठी रु.५८५०/- याप्रमाणे ७४३ कीड सर्वेक्षकांसाठी | कामगंध सापळे व दर्शक झाडांसाठी एरंडी बी लावणे. **कापूस-** स्पोडोप्टेरा व शेंदरी बोंडअळी प्रत्येकी २ सापळे प्रमाणे प्रत्येक प्लॉटसाठी ४सापळे आणि ८ स्पोडो व ६पेक्टीनोफोरा ल्यूर्स. **सोयाबीन-** हेलीकोव्हर्पा व स्पोडोपटेरा प्रत्येकी २ सापळे प्रमाणे प्रत्येक प्लॉटसाठी ४सापळे आणि ६ स्पोडो व ६ हेलील्यूर्स तसेच प्रत्येक प्लॉट्साठी ५० ग्रॅम एरंडी बी. **भात-** पिवळा खोड कीडा २ ट्रॅप्स आणि ६ ल्यूर्स. **तूर-** हेलीकोव्हर्पासाठी प्रत्येक प्लॉट २ फेरोमेन ट्रॅप्स व ६ हेली लूर्स. **हरभरा-** हेलीकोव्हर्पासाठी प्रत्येक प्लॉट २ फेरोमेन ट्रॅप्स व ४ हेली लूर्स. | ४५.०७ | **कृषि विभाग** |
| | **ब) हरभरा पिकाकरीताः-** प्रत्येक कीड सर्वेक्षक २० फिक्स प्लॉटसाठी ४० फेरोमन ट्रॅप व ८० हेलीलूर्ससाठी रु.१५००/- याप्रमाणे ४६९ कीड सर्वेक्षकांसाठी | | ७.०४ | |
| | एकूण क | | ७७.६७ | |
| १३ | **प्रचार व प्रसिध्दी साहीत्य -** एमएसआरटीसी बस स्टॅंड, पोस्टर्स, घडीपत्रीका इतर इलेक्ट्रॉनिक मिडीया, वृत्तपत्रे ३४ जिल्हयांसाठी. | जनजागृती करण्यासाठी | १५.०० | **कृषि विभाग** |
| | एकूण ड | | १५.०० | |

"प्रपत्र अ"

पिकांवरील कीड- रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) २०१६-१७

सोयाबीन-कापूस, तूर, भात व हरभरा पिकांकरिता बाबनिहाय लागणाऱ्या निधीचा तपशील

(रु. लाखात)

| अ. क्र. | बाब | बाबनिहाय खर्चाचा तपशील | लागणारे अनुदान | संस्था |
|---|---|---|---|---|
| २० | वरील सर्व कार्यक्रमाचे समन्वयन, प्रकल्प मुल्यमापन तसेच, सर्वेक्षण चमू तसेच सहभागी संस्थांसाठी लॅपटॉप, टॅब्लेटस्, संगणक, स्कॅनर, कॅमेरा, भिंग, जीपीएस उपकरणे, सर्वेक्षण कीट इत्यादीची खरेदी करणे | नियमीत बैठकांचे आयोजन करणे, प्रकल्पाचे त्रयस्थ संस्थेकडून मुल्यमापन करुन घेणे, राज्यस्तरीय सनियंत्रण कक्ष तसेच, सर्वेक्षण चमुसाठी इंटरनेट सुविधा, स्टेशनरी, कार्यालयीन सुविधा, संगणक, टॅब्लेटस्, प्रिंटर व इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करणे. | ५.१० | कृषि विभाग |

**क्रॉपसॅप प्रकल्पांतर्गत सन २०१६-१७ साठी दि.१४/६/२०१६ रोजी सहभागी संस्थांच्या तांत्रिक बैठकीत सर्वेक्षण प्रपत्रे व ॲडव्हायजरी कॅप्सूल्स निश्चित करण्यात आली असून कापूस पीक लागवडीच्या ६० दिवसांनतर शेंदरी बोंड अळीसाठी कीड सर्वेक्षकांच्या फिक्स प्लॉटसाठी जादाचे २ फेरोमेन ट्रॅप्स आणि ६पेक्टीनोफोरा ल्यूर्स लावायचे आहेत. त्यादृष्टीने सदर कालमर्यादेत फेरोमेन ट्रॅप्स आणि ल्यूर्सची कीड सर्वेक्षकांना उपलब्धता करुन देण्याची विभागीय कृषि सहसंचालक यांनी कटाक्षाने दक्षता घ्यावी.** "प्रपत्र अ" मधील बदललेल्या बाबींसाठी सोबतच्या मासिक प्रगती अहवालातील आर्थिक लक्षांक सुधारीत करण्यात येत असून त्याप्रमाणे मासिक प्रगती अहवाल सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**सोबत:** वरीलप्रमाणे

कृ.वि.देशमुख

संचालक (विस्तार व प्रशिक्षण)

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत: माहितीस्तव:

१. कृषि सहसंहचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
२. कृषि सहसंहचालक वि.प्र. १ / २ / ३, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
३. कीटकशास्त्र विभाग प्रमुख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विदयापीठ, परभणी
४. कीटकशास्त्र विभाग प्रमुख, महात्मा फुले कृषि विदयापीठ, राहूरी
५. कीटकशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.
६. कीटकशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
७. श्री. कैलास ईळेकर, प्रमुख प्रणाली विश्लेषक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एनआयसी), पुणे- ४११ ००७
८. कृषि उपसंचालक (माहिती), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
९. कृषि उपसंचालक (प्रकल्प), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५

मासिक प्रगती अहवाल

पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) २०१६-१७ माहे: अखेर रु. हजारात

| अ. क्र. | विभाग/ संस्था | जिल्हा | एनसीआयपीएम नवी दिल्ली येथील इंटरनेट सर्व्हरच्या व्यवस्थापनासाठी सर्व्हर सपोर्टर रु २५००० प्रति महिना याप्रमाणे ३.५ महिन्यांसाठी | | राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था येथे आयपीएम गाव संबंधीत कृषि सहाय्यकांसाठी पाच दिवसीय प्रशिक्षण रु.६०००/- प्रति कृषि सहाय्यक याप्रमाणे | | | | कीड सर्वेक्षकांसाठी सोयाबीन, कापूस, तूर, भात व हरभरा पिकांकरीता फेरोमेन ट्रॅप्स व ल्युर्स | | कापूस, सोयाबीन, भात, तूर व हरभरा पिकांसाठी प्रचार व प्रसिध्दी साहीत्य पोस्टर्स, घडीपत्रीका इतर इलेक्ट्रॉनिक मिडीया, वृत्तपत्रांद्वारे ३४ जिल्हयांमध्ये प्रसिद्धी देणे. | | | | क्रॉपसॅप प्रकल्पातील सर्व कार्यक्रमाचे समन्वयन, सर्वेक्षण चमू तसेच सहभागी संस्थांसाठी लॅपटॉप, टॅब्लेटस्, संगणक, स्कॅनर, कॅमेरा, भिंग, जीपीएस उपकरणे, सर्वेक्षण कीट इत्यादीची खरेदी करणे, प्रकल्प मुल्यमापन | | एकूण आर्थिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आर्थिक | | भौतिक | | आर्थिक | | आर्थिक | | भौतिक | | आर्थिक | | आर्थिक | | लक्ष | साध्य |
| | | | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | | |
| १ | २ | ३ | २४ | २५ | ४० | ४१ | ४२ | ४३ | ४४ | ४५ | ४८ | ४९ | ५० | ५१ | ९० | ९१ | ९२ | ९३ |
| १ | ठाणे | पालघर | | | २ | | | | | | | | | | | | ११९४.८२५ | ०.००० |
| २ | | ठाणे | | | २ | | | | | | | | | | | | ७८५.५०० | ०.००० |
| ३ | | रायगड | | | २ | | | | | | | | | | | | १९५०.००० | ०.००० |
| ४ | | रत्नागिरी | | | २ | | | | | | | | | | | | १२५२.५०० | ०.००० |
| ५ | | सिंधुदुर्ग | | | २ | | | | | | | | | | | | १०१९.००० | ०.००० |
| | | विभाग स्तर | | | | | | | १६०.००० | | | | | | | | ७५४.५५० | ०.००० |
| **ठाणे विभाग** | | **५** | ०.००० | ०.००० | १० | ० | ०.००० | ०.००० | १६०.००० | ०.००० | ० | ० | ०.००० | ०.००० | ०.००० | ०.००० | **६९५६.३७५** | **०.०००** |
| ६ | नाशिक | नाशिक | | | २ | | | | | | | | | | | | १९९०.१५० | ०.००० |
| ७ | | धुळे | | | २ | | | | | | | | | | | | १३८३.३५० | ०.००० |
| ८ | | नंदूरबार | | | २ | | | | | | | | | | | | १३१४.१५० | ०.००० |
| ९ | | जळगांव | | | २ | | | | | | | | | | | | ३३३७.५०० | ०.००० |
| | | विभाग स्तर | | | | | | | ५६१.७५० | | | | | | | | १६७१.६७५ | ०.००० |
| **नाशिक विभाग** | | ४ | ०.००० | ०.००० | ८ | ० | ०.००० | ०.००० | ५६१.७५० | ०.००० | ० | ० | ०.००० | ०.००० | ०.००० | ०.००० | **९६९६.८२५** | **०.०००** |
| १० | पुणे | पुणे | | | २ | | | | | | | | | | | | १५३६.७५० | ०.००० |
| ११ | | अहमदनगर | | | २ | | | | | | | | | | | | २२४५.५०० | ०.००० |
| १२ | | सोलापूर | | | २ | | | | | | | | | | | | ६३४.१५० | ०.००० |
| | | विभाग स्तर | | | | | | | २७६.७५० | | | | | | | | ८५८.८७५ | ०.००० |
| **पुणे विभाग** | | **३** | ०.००० | ०.००० | **६** | ० | ०.००० | ०.००० | **२७६.७५०** | ०.००० | ० | ० | ०.००० | ०.००० | ०.००० | ०.००० | **५२७५.२७५** | **०.०००** |
| १३ | कोल्हापूर | सातारा | | | २ | | | | | | | | | | | | ११२५.३५० | ०.००० |
| १४ | | सांगली | | | २ | | | | | | | | | | | | ८९८.९५० | ०.००० |
| १५ | | कोल्हापूर | | | २ | | | | | | | | | | | | १९३१.३५० | ०.००० |
| | | विभाग स्तर | | | | | | | २५३.६५० | | | | | | | | ८१४.०७५ | ०.००० |
| **कोल्हापूर विभाग** | | **३** | ०.००० | ०.००० | **६** | ० | ०.००० | ०.००० | **२५३.६५०** | ०.००० | ० | ० | ०.००० | ०.००० | ०.००० | ०.००० | **४७६९.७२५** | **०.०००** |
| १६ | औरंगाबाद | औरंगाबाद | | | २ | | | | | | | | | | | | ३१५७.३५० | ०.००० |
| १७ | | जालना | | | २ | | | | | | | | | | | | ३२१७.३५० | ०.००० |
| १८ | | बीड | | | २ | | | | | | | | | | | | ३७९०.३०० | ०.००० |
| | | विभाग स्तर | | | | | | | ७१०.८५० | | | | | | | | २१२४.८२५ | ०.००० |
| **औरंगाबाद विभाग** | | **३** | ०.००० | ०.००० | **६** | ० | ०.००० | ०.००० | **७१०.८५०** | ०.००० | ० | ० | ०.००० | ०.००० | ०.००० | ०.००० | **१२२८९.८२५** | **०.०००** |
| १९ | लातूर | लातूर | | | २ | | | | | | | | | | | | २९८२.०५० | ०.००० |
| २० | | उस्मानाबाद | | | २ | | | | | | | | | | | | १५६२.७०० | ०.००० |
| २१ | | परभणी | | | २ | | | | | | | | | | | | २८५३.१०० | ०.००० |
| २२ | | हिंगोली | | | २ | | | | | | | | | | | | २१४७.३५० | ०.००० |
| २३ | | नांदेड | | | २ | | | | | | | | | | | | ४३०६.४५० | ०.००० |
| | | विभाग स्तर | | | | | | | ९५२.०५० | | | | | | | | ३०४९.२२५ | ०.००० |
| **लातूर विभाग** | | ५ | ०.००० | ०.००० | १० | ० | ०.००० | ०.००० | **९५२.०५०** | ०.००० | ० | ० | ०.००० | ०.००० | ०.००० | ०.००० | **१६९००.८७५** | **०.०००** |

मासिक प्रगती अहवाल

पिकांवरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) २०१६-१७ माहे: अखेर रु. हजारात

| अ. क्र. | विभाग/ संस्था | जिल्हा | एनसीआयपीएम नवी दिल्ली येथील इंटरनेट सर्व्हरच्या व्यवस्थापनासाठी सर्व्हर सपोर्टर रु २५००० प्रति महिना याप्रमाणे ३.५ महिन्यांसाठी | | राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था येथे आयपीएम गाव संबंधीत कृषि सहाय्यकांसाठी पाच दिवसीय प्रशिक्षण रु.६०००/- प्रति कृषि सहाय्यक याप्रमाणे | | | | कीड सर्वेक्षकांसाठी सोयाबीन, कापूस, तूर, भात व हरभरा पिकांकरीता फेरोमेन ट्रॅप्स व ल्युर्स | | कापूस, सोयाबीन, भात, तूर व हरभरा पिकांसाठी प्रचार व प्रसिध्दी साहीत्य पोस्टर्स, घडीपत्रीका इतर इलेक्ट्रॉनिक मिडीया, वृत्तपत्रांद्वारे ३४ जिल्हयांमध्ये प्रसिद्धी देणे. | | | | क्रॉपसॅप प्रकल्पातील सर्व कार्यक्रमाचे समन्वयन, सर्वेक्षण चमू तसेच सहभागी संस्थांसाठी लॅपटॉप, टॅब्लेटस्, संगणक, स्कॅनर, कॅमेरा, भिंग, जीपीएस उपकरणे, सर्वेक्षण कीट इत्यादीची खरेदी करणे, प्रकल्प मुल्यमापन | | एकूण आर्थिक | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आर्थिक | | भौतिक | | आर्थिक | | आर्थिक | | भौतिक | | आर्थिक | | आर्थिक | | लक्ष | साध्य |
| | | | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | लक्ष | साध्य | | |
| १ | २ | ३ | २४ | २५ | ४० | ४१ | ४२ | ४३ | ४४ | ४५ | ४८ | ४९ | ५० | ५१ | ९० | ९१ | ९२ | ९३ |
| २४ | अमरावती | अमरावती | | | ३ | | | | | | | | | | | | ४२७०.७०० | ०.००० |
| २५ | | बुलढाणा | | | २ | | | | | | | | | | | | ४१०८.०५० | ०.००० |
| २६ | | अकोला | | | २ | | | | | | | | | | | | २७९२.३०० | ०.००० |
| २७ | | वाशिम | | | २ | | | | | | | | | | | | २६२९.१०० | ०.००० |
| २८ | | यवतमाळ | | | २ | | | | | | | | | | | | ५४८७.००० | ०.००० |
| | | विभाग स्तर | | | | | | | १३७७.४५० | | | | | | | | ४०९९.६२५ | ०.००० |
| **अमरावती विभाग** | | **५** | **०.०००** | **०.०००** | **११** | **०** | **०.०००** | **०.०००** | **१३७७.४५०** | **०.०००** | **०** | **०** | **०.०००** | **०.०००** | **०.०००** | **०.०००** | **२३३८६.७७५** | **०.०००** |
| २९ | नागपूर | चंद्रपूर | | | २ | | | | | | | | | | | | ३२३६.१५० | ०.००० |
| ३० | | गडचिरोली | | | २ | | | | | | | | | | | | १५६६.५५० | ०.००० |
| ३१ | | वर्धा | | | २ | | | | | | | | | | | | २७४२.१५० | ०.००० |
| ३२ | | नागपूर | | | ३ | | | | | | | | | | | | ३५४७.९०० | ०.००० |
| ३३ | | भंडारा | | | २ | | | | | | | | | | | | १४०५.७५० | ०.००० |
| ३४ | | गोंदीया | | | २ | | | | | | | | | | | | १५०६.५५० | ०.००० |
| | | विभाग स्तर | | | | | | | ९१७.५५० | | | | | | | | २७६०.१२५ | ०.००० |
| **नागपूर विभाग** | | **६** | **०.०००** | **०.०००** | **१३** | **०** | **०.०००** | **०.०००** | **९१७.५५०** | **०.०००** | **०** | **०** | **०.०००** | **०.०००** | **०.०००** | **०.०००** | **१६७६५.१७५** | **०.०००** |
| ३५ | कृषि आयुक्तालय स्तर | | | | | | ०.००० | | | | ३४ | | १५००.००० | | ५१०.४५० | | २३६०.४५० | ०.००० |
| **एकूण कृषि विभाग** | | **३४** | **०.०००** | **०.०००** | **७०** | **०** | **०.०००** | **०.०००** | **५२१०.०५०** | **०.०००** | **३४** | **०** | **१५००.०००** | **०.०००** | **५१०.४५०** | **०.०००** | **९८४०१.३००** | **०.०००** |
| ३६ | एनसीआयपीएम, नवी दिल्ली | | ८८.००० | | | | ०.००० | | | | | | | | | | १११२.००० | ०.००० |
| ३७ | एमएयु, परभणी | | | | | | ०.००० | | | | | | | | | | ८०३.५०० | ०.००० |
| ३८ | एमपीकेव्ही, राहुरी | | | | | | ०.००० | | | | | | | | | | १९५६.७०० | ०.००० |
| ३९ | डॉ.पीडीकेव्ही, अकोला | | | | | | ०.००० | | | | | | | | | | १३५७.००० | ०.००० |
| ४० | डॉ. बीएसकेकेव्ही, दापोली | | | | | | ०.००० | | | | | | | | | | ५८९.००० | ०.००० |
| ४१ | डीएसआर, इंदोर | | | | | | ०.००० | | | | | | | | | | ४६४.००० | ०.००० |
| ४२ | सीआयसीआर, नागपूर | | | | | | ०.००० | | | | | | | | | | ४८९.००० | ०.००० |
| ४३ | आयआयपीआर, कानपूर | | | | | | ०.००० | | | | | | | | | | ४९९.००० | ०.००० |
| ४४ | सीआरआरआय, कटक | | | | | | ०.००० | | | | | | | | | | ५२३.००० | ०.००० |
| ४५ | क्रीडा, हैद्राबाद | | | | | | ०.००० | | | | | | | | | | ७०४.५०० | ०.००० |
| ४६ | एनआयपीएचएम, हैद्राबाद | | | | | | ४२०.००० | | | | | | | | | | ४९५.००० | ०.००० |
| ४७ | एनआयसी, पुणे | | | | | | ०.००० | | | | | | | | | | २६०६.००० | ०.००० |
| **एकूण संस्था** | | | **८८.०००** | **०.०००** | **०** | **०** | **४२०.०००** | **०.०००** | **०.०००** | **०.०००** | **०** | **०** | **०.०००** | **०.०००** | **०.०००** | **०.०००** | **११५९८.७००** | **०.०००** |
| **एकूण राज्य** | | | **८८.०००** | **०.०००** | **७०** | **०** | **४२०.०००** | **०.०००** | **५२१०.०५०** | **०.०००** | **३४** | **०** | **१५००.०००** | **०.०००** | **५१०.४५०** | **०.०००** | **११००००.०००** | **०.०००** |